# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विषय : विद्यापीठातील विविध अधिविभागातील नियमित व हंगामी शिक्षक तसेच समकक्ष पदे भरण्यासाठी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातींच्या अनुषंगाने प्राप्त झालेले अर्ज तसेच नियमित शिक्षकांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या अनुषंगाने प्राप्त झालेले अर्ज निर्लेखन करण्याच्या अनुषंगाने...

संदर्भ : विद्यापीठाच्या रेकॉर्ड विभागाचे क्र. SU/MTG/Record/ दि. २७ सप्टेंबर, १९८३ आणि क्र. SU/PG/Record/ दि. ११ एप्रिल, १९८६ नुसार निर्गमित केलेले परिपत्रक

उपरोक्त विषयाबाबत आदेशावरून कळविण्यात येते की, विद्यापीठातील विविध अधिविभागातील नियमित व हंगामी शिक्षक तसेच शिक्षक समकक्ष पदे भरण्यासाठी वेळोवेळी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. सदर जाहिरातींच्या अनुषंगाने उमेदवारांनी त्यांचे अर्ज विद्यापीठ कार्यालयाकडे ज्या-त्या वेळी जमा केले आहेत. तसेच विद्यापीठाच्या नियमित सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील सेवकांनी त्यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या अनुषंगाने विहित मार्गाने अर्ज सादर केले होते. वरीलपैकी काही जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर निवड व नेमणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तसेच काही जाहिरातींच्या अनुषंगाने निवड व नेमणूक प्रक्रिया पूर्ण झालेली नाही, अशा अर्जांवर आता पुढील कार्यवाही संभवत नाही. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या नियमित सेवेत असलेल्या शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील सेवकांनी त्यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या अनुषंगाने अर्ज सादर केले होते. सदर अर्जावरची कार्यवाही पूर्ण झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाने जुन्या दप्तरांबाबत / कागदपत्रांबाबत वेळोवेळी निर्गमित केलेली संदर्भाधिन येथील नमूद परिपत्रके विचारात घेऊन या विभागाकडे असलेले कायमस्वरूपी दप्तर वगळून अन्य दप्तर / कागदपत्रे निर्लेखन करण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सोबत दोन याद्या प्रसिद्ध करण्यात येत असून सदर यादीमध्ये प्रसिद्ध केलेल्या नावासमोर प्राप्त झालेल्या अर्जापैकी निर्लेखित करावयाच्या अर्जांची संख्या नमूद केली आहे. तरी ज्या शिक्षकांना त्यांचे यादीमध्ये नमूद केलेले अर्ज हवे असतील त्यांनी आस्थापना पीजी. विभागाशी दि. ३१ मे, २०२५ पूर्वी लिखित अर्जासह कार्यालयीन कामकाजादिवशी रोज सायंकाळी ०४.३० ते ५.३० या वेळेत संपर्क साधून संबंधित कार्यासनाला अवगत करावे व आपले जुने अर्ज पुढील योग्य वापरासाठी घेऊन जावेत. सदर दिनांकानंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, तरी पर्यावरणाची हानी होऊ नये, यासाठी या परिपत्रकाचा जास्तीत जास्त शिक्षकांनी लाभ घ्यावा, असा आदेश याद्वारे निर्गमित करण्यात येत आहे.

कुलसचिव

जा.क्र. शिवाजी विद्या./आस्थापना/पीजी/ 536

दि. 02 MAY 2025

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख / संचालक / समन्वयक, विद्यापीठ अधिविभाग / प्रशाळा (स्कूल) / केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. सर्व प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिष्ठाता सर्व विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, संचालक - विद्यार्थी कल्याण, सर्व रेक्टर्स, कायदा अधिकारी

५. समन्वयक, इंटरनेट विभाग - INTRANET तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दी करीता.

प्रत माहितीसाठी -

६. मा. कुलगुरु / मा. प्र-कुलगुरु, मा. वित्त व लेखाधिकारी, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे कार्यालय.

D:\1SHEKHAR_12.7.2024 onwards\CTK 15.07.2024\Circulars\Circular_April. 25.docx